१ फेब्रुवारीपासून गोवेकरांना कॅसिनोबंदी

पणजी : गोवेकरांना येत्या १ फेब्रुवारीपासून राज्यातील कॅसिनोंमध्ये प्रवेश देण्यात येणार नाही, असे राज्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी गुरुवारी येथे जाहीर केले.

गोव्याचे वस्तू आणि सेवा कर आयुक्त या निर्णयाची अंमलबजावणी करणार आहेत.

बिघडलेल्या देशस्थितीला समाजच जबाबदार – सरसंघचालक

नागपूर : देशामध्ये गेल्या काही दिवसांत जे वातावरण बिघडले आहे त्याला समाजच जबाबदार आहे, असे मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केले.

राजकारण हे कायम समाजातील भिन्न घटकांमध्ये द्वेष निर्माण करण्याचा प्रयत्न करते. राजकारणामुळे निर्माण झालेल्या द्वेषाला कितपत बळी पडायचे याचा विचार समाजाने करायला हवा, असेही डॉ. भागवत म्हणाले.

जेएमटी आर्ट्स आणि जेजेपी विज्ञान महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त गुरुवारी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

सरसंघचालक म्हणाले, राजकारणाच्या माध्यमातून लोकांना कायम चिथावणी दिली जाते. प्रत्यक्षात वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांची स्वतःची काही शक्ती नसते. परंतु समाजात कर्तृत्व सक्रियता व सकारात्मकतेच्या प्रकाशाचा अभाव असतो व त्यामुळे लोकांना देशात अंधकारमय वातावरण असल्याचे वाटते.

'एनडीएफबी'च्या सदस्यांकडून शस्त्रे सुपूर्द

गुवाहाटी : सरकारशी शांतता करार केल्यानंतर नॅशनल डेमोक्रॅटिक फ्रण्ट ऑफ बोडोलॅण्ड (एनडीएफबी) या बोडो दहशतवाद्यांच्या गटाच्या १६०० हून अधिक सदस्यांनी गुरुवारी आपल्याकडील शस्त्रे आणि स्फोटके आसामचे मुख्यमंत्री सर्वानंद सोनोवाल यांच्याकडे सुपूर्द केली.

MCXCCL

मल्टी कमॉडिटी एक्स्चेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेड

एक्स्चेंज स्क्वेअर, सुरेन रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०० ०९३, भारत
सीआयएन: U74999MH2008PLC185349 | ई-मेल आयडी: mcx.secretarial@gmail.com | संकेतस्थळ: https://www.mcxccl.com

३१ डिसेंबर, २०१९ रोजी संपलेल्या तिमाही व नऊमाहीसाठी अलेखापरिक्षित आर्थिक परिणामांचे सार

(₹ लाखांमध्ये)

तपशील	संपलेली तिमाही ३१ डिसेंबर २०१९ अलेखापरीक्षित	संपलेली तिमाही ३० सप्टेंबर २०१९ अलेखापरीक्षित	संपलेली तिमाही ३१ डिसेंबर २०१८ अलेखापरीक्षित	संपलेली नऊमाही ३१ डिसेंबर २०१९ अलेखापरीक्षित	संपलेली नऊमाही ३१ डिसेंबर २०१८ अलेखापरीक्षित	संपलेले वर्ष ३१ मार्च २०१९ लेखापरीक्षित
प्रचालनातून एकूण उत्पन्न (इतर उत्पन्न)	१,५७६.५०	१,९०७.४७	१,४५८.२३	४,९८४.८६	१,९१७.७६	३,३९३.५८
कालावधीकरिता निव्वळ नफा (कर अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींपूर्वी)	५९६.८१	७८२.३९	४३१.८९	१,८६८.९८	८८२.१०	१,३४०.६७
कालावधीकरिता करापूर्वीचा निव्वळ नफा (अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींनंतर)	५९६.८१	७८२.३९	४३१.८९	१,८६८.९८	८८२.१०	१,३४०.६७
कालावधीकरिता करानंतरचा निव्वळ नफा (अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींनंतर)	६८७.८९	९२८.७३	३७७.२९	१,९५७.२६	७००.६६	९४३.४४
कालावधीकरिता एकूण व्यापक उत्पन्न [(कालावधीकरिता सर्वसमावेशक नफा (करानंतर) आणि इतर व्यापक उत्पन्न (करानंतर)]	६७७.२५	९२९.२०	३६६.२७	१,९४६.६२	६८७.४२	९५९.६६
समभाग भांडवल (₹ १०/- प्रति शेअर)	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२२,४९८.५०	२३,९९८.५०	२२,४९८.५०	२३,९९८.५०
राखीव (पुनर्मूल्यांकन निधी वगळून मागील वर्षाच्या लेखापरिक्षित ताळेबंदात दर्शविल्यानुसार)	–	–	–	–	–	(२१,२२४.२५)
प्रत्येक समभागाचे उत्पन्न (₹ १०/- प्रत्येकी)*						
मूलभूत (₹)	०.२९	०.३९	०.२२	०.८२	०.४९	०.५८
सौमिकृत (₹)	०.२९	०.३९	०.२२	०.८२	०.४९	०.५८

*अंतरिम कालावधीसाठी प्रति समभाग उत्पन्न हे वार्षिक नाही.

सूचना:

१. वरील तक्ता त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे सार आहे. त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे पूर्ण स्वरूप कंपनीचे संकेतस्थळ **www.mcxccl.com** वर उपलब्ध आहे.

२. कंपनीने क्लिअरिंग आणि सेटलमेंट ऑपरेशन्स सप्टेंबर १, २०१८ रोजी सुरू केल्याकारणाने, डिसेंबर ३१, २०१८ रोजी संपलेल्या नऊमाहीकरीता तुलनात्मक आकडेवारी उपलब्ध नाही.

३. दिनांक ३० जानेवारी, २०२० रोजी, वरील निष्कर्षांचे पुनरावलोकन लेखापरीक्षा समितीकडून केले गेले आहे आणि संचालक मंडळाच्या सभेत त्यांना मान्यता मिळाली आहे.

मल्टी कमॉडिटी एक्स्चेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेड करिता
स्वाक्षरी/-
नरेंद्र अहलावत
व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी

ठिकाण: मुंबई | दिनांक: ३० जानेवारी २०२०